# कॅपिटॉल हाईट्सला क्रिसिलचा पुरस्कार



टाटा कॅपिटॉल इन्फ्रास्ट्रक्चर लि. तर्फे रामबाग येथे साकारण्यात येत असलेल्या कॅपिटॉल हाइट्स या योजनेला सेव्हन स्टार क्रिसिल अवार्ड प्रदान करण्यात आला असल्याची माहिती एका पत्रपरिषदेत अभिजित माहेश्वरी यांनी दिली. यासोबतच या आलिशान योजनेत चार लाख चौ. फूट जागेवर ट्रिलियम मॉल तयार करण्यात येत असल्याची घोषणा देखील त्यांनी केली.

या योजनेला ग्राहकांचा भरपूर प्रतिसाद मिळत असून नागपूर शहर शैक्षणिक हब होत असल्यामुळे याठिकाणी आणखी लोक येतील व त्यातूनच या योजनेला आणखी उत्तम प्रतिसाद मिळेल असेही यावेळी त्यांनी सांगितले. या योजनेत आधुनिक जीवनशैलीचे हवेशीर फ्लॅट्स तसेच पर्यावरणानुकूल बांधकाम व सोयी असल्यामुळे या योजनेला ग्रीन गोल्ड सर्टिफिकेट मिळाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी केदार नारखेडे प्रामुख्याने उपस्थित होते.

TARUN BHARAT DATE 26/09/2015